जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२७/०८/२०२३
## दि.२६/०८/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ८७०/२०२३,भादविक ३०७,१४१,१४३,१४४,१४७,३५२,५०४ |
| **फिर्यादी** | हुजेफा अत्तरवाला,वय-३८ वर्षे,रा.गंगा फ्लॉरेन्टीना,महंमदवाडी,पुणे |
| **आरोपीत** | १.प्रशांत जामेकर सामल,वय ३८ वर्षे,रा.घुलेवस्ती,उंड्री,पुणे २.मौसम कम्मानसिंग कुंबर,वय २७ वर्षे,रा.होले वस्ती,कोंढवा-बुद्रक,पुणे (अटक) व इतर दोन ते तीन इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०८/२०२३ रोजी १५/४५ वा.स्पाईस फॅक्टरी क्लोव्हर हिल्स प्लाझा एनआयबीएम रोड, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे सहकारी यांचेसह स्पाईस फॅक्टरी क्लोव्हर,हिल्स प्लाझा एनआय बीएम रोड,पुणे येथे जेवण करण्यासाठी गेले असताना,त्यांनी जेवण केल्यावर त्यांचे बीला मध्ये इतर सर्व्हिस चार्जेस लावण्यात आल्याने,फिर्यादी यांनी हॉटेलचे मॅनेजर यास सर्व्हिस चार्जेस बाबत विचारल्याचे कारणावरून त्याने व त्याचे हॉटेल मधील इतर कामगार यांनी फिर्यादी यांचे डोक्यात काचेची बाटली व बरणीने तसेच फिर्यादी यांचे मित्र अनिकेत परदेशी याचे डोक्यात कठीण वस्तुने व राम त्यागी याचे डोक्यात व उजव्या हाताचे तर्जनी बोटावर धारदार शस्त्राने मारहाण करून,त्यांना गंभीर जखमी करुन,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. विजय वगरे ७७२२०११२४५ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १२७२/२०२३,भादविक ३२४,५०४,५०६,महा.पो.का.क.३७(१)(३)१३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | एक अल्पवयीन मुलगा,वय-१६ वर्षे,रा.हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | विनोद तुळजाराम बंदिछोडे,वय-२५ वर्ष,रा.कामळे मळा,हडपसर,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/८/२०२३ रोजी १४/०० वा. युनियन बॅक,मंत्री मार्केट,हडपसर गाव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्रासह मोटार सायकलवरून जात असताना,यातील नमुद इसमाने फिर्यादीस अडवुन शिवीगाळ करून,तु भाई झाला का,तुला रहायचे आहे का,तुझा मर्डरच करतो असे बोलुन फायटरने तोंडावर,पोटावर व गळयावर मारहाण करून,कमरेला असलेले धारदार शस्त्र दाखवुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यानंतर सदर इसमाने पुढे काही अंतरावर गेल्यावर धारदार शस्त्र काढुन,ते हवेमध्ये भिरकावुन तुला मी जीवंत सोडणार नाही तुझा मर्डर करेन,जर कोणी मध्ये आले तर मी कोणालाही सोडणार नाही असे मोठ-मोठयाने बोलुन सदर परिसरात दहशत निर्माण केली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. दिगंबर सोनटक्के ९८२३३७३८४८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**